**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी )**

जाक्र. प्राथ-२/खाप्राशा/मा.इंग्रजी /२०१६
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय,
दिनांक : 19 JAN 2016

प्रति

प्रशासन अधिकारी ,
शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड महानगरपालीका

विषय: <u>प्रथम मान्यता मिळणेबाबत</u>
एऑन एज्युकेशन सोसायटी पुणे

संदर्भ: १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र.नप्राशा-१००८/प्रक्रं ६७८/प्राशि-३ दि. १८.०८.२००९
२.आपले पत्र जा.क्र. शिक्षण खाप्राशा/३/कावि/५६९/१२ दिनांक १२/१०/२०१२
३.संस्थेचे पत्र दिनांक १०.१२.२०१४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्था । संदर्भ क्र-१ अन्वये तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व इंग्रजी माध्यमासाठी सन २००९-१०-या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २००९-१०-या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ व ३,चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. १ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००९ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५ | ६ |
| १. | एऑन एज्युकेशन सोसायटी पुणे | स्टेपिंग स्टोन स्कूल, थेरगांव पुणे | १ ली | इंग्रजी | जुन २००९ |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा** परवानगी आपोआप रद्द **होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणसंकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे अनुषंगाने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जांचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनाक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्याआदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तदनंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१.शिक्षणधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे

२.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

३.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

४.अध्यक्ष/सचिव, एऑन एजयुकेशन सोसायटी , पुणे

**कायम विना अनुदान तत्वावर**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/९५७/२०१७.
दिनांक :- ८ / ३ /२०१७

प्रति,

**अध्यक्ष**
आयन एज्युकेशन सोसायटी
चिंचवड पुणे

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| द स्टेफिन स्टोन स्कुल, चिंचवड | इंग्रजी | नैसर्गिक | इ. २ री ते ५ वीच्या प्रथम तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती** :-

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).

२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

७) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये वंचित गटातील आणि दुर्बल घटकातील बालकांसाठी २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक राहील.

८) सदरची मान्यता संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारे दिलेली असून त्यात तफावत आढळल्यास वा चुकीची आढळल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्यांची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

९) सदर मान्यतेसंदर्भात कोणाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्याची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

७/३/२०१७

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

**कायम विना अनुदान तत्वावर**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/४४७/२०१७.
दिनांक :- २० /९/२०१७

**प्रति,**

**अध्यक्ष**
आयन एज्युकेशन सोसायटी
चिंचवड पुणे

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| द स्टेफिन स्टोन स्कुल, चिंचवड | इंग्रजी | नैसर्गिक | इ. ६वी ते ७ वीच्या प्रथम तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).

२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

७) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये वंचित गटातील आणि दुर्बल घटकातील बालकांसाठी २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक राहील.

८) सदरची मान्यता संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारे दिलेली असून त्यात तफावत आढळल्यास वा चुकीची आढळल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्यांची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

९) सदर मान्यतेसंदर्भात कोणाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्याची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

20/9/2017

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.
दुरध्वनी : (०२०) २६०५४३१८
फॅक्स (०२०) २६१२८१५७/२६१२५८७४
दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२
ई-मेल depmah2@gmail.com

जा.क्र./प्राशिसं/खाप्राशा/स्व.अ.मा.५वी ८वी/ड ५१२/2171

दिनांक : ४.०८.२०२०.

04 AUG 2020

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,
मुंबई-३२.

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर इ. ५ वी व इ. ८ वी चे वर्ग सुरू करणेबाबत.**

संदर्भ :-
१. शासन पत्र क. आटीई-२०१५/४४/१५एसएम-५, दि.११ मे.२०१५.
२. शासन निर्णय क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ /टिएनटि-२ दिनांक २८.०८.२०१५.
३. शासन शुद्धीपत्रक प्राधाशो२०१४(१८१/२०१४)/एसएम-५, दिनांक २४.०३.२०१५.
४. महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित अधिनियम २०१२, अंमलबजावणी दिनांक १९ .०१.२०१३.
५. **शासन निर्णय क्रमांक :प्राशातु-२०१८/प्र.क्र.२०४/एसएम-५, दिनांक १९.०९.२०१९.**
६. **संचालनालयाचे पत्र जा.क्र./प्राशिसं/खाप्राशा/वर्गवाढ/५वी-८वी/ड-५१२/२०१९/६२४, दिनांक ५.०२.२०२०**

उपरोक्त विषयान्वये, खालील खाजगी शाळेला स्वयंअर्थसहायित तत्वावर इ. ८ वी च्या वर्गास मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव शिफारशीसह संचालनालयास प्राप्त झाला आहे.

| अ. क्र. | संस्थेचे/शाळेचे नाव | शाळेचा यु-डायस क्र. | माध्यम | इयत्ता | वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दि स्टेपिंग स्टोन स्कुल, चिंचवड, पुणे-३३. | २७२५१९०२५१४ | इंग्रजी | इ. ८ वी | २०१९-२० | पात्र |

**राज्यातील अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित/स्वयंअर्थसहायित खाजगी प्राथमिक/उच्च प्राथमिक शाळांना इ. ५ वी व इ. ८ वी चे वर्ग जोडण्याबाबत आरटीई अंतर्गत तरतूदीनुसार मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प./आयुक्त मनपा/मुख्याधिकारी नपा/कमांडींग ऑफिसर कटक मंडळ यांचे शिफारशीने संचालनालयास प्राप्त झालेले प्रस्ताव शासनास सादर करण्याचे शासनाने संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित अधिनियम २०१२ ची दिनांक १९ जानेवारी २०१३ पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार सध्या स्वयंअर्थसहायित तत्वावर वर्गांना मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे. शासन निर्णय दिनांक २८ ऑगष्ट २०१५ नुसार नैसर्गिक वाढ बंद झाली आहे.

**शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ अन्वये इ. ५ वी व इ. ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहायित तत्वावर जोडण्यासाठी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे.**

१. सद्य:स्थितीत स्वयंअर्थसहायित तत्वावर शाळेस मान्यता देण्यात येते, त्यामुळे अनुदानित/विना अनुदानित/अंशत: अनुदानित/कायम विना अनुदानित तत्वावर सुरू असलेल्या खाजगी शाळांना इयत्ता ५ वी चा/इ. ८ वी चा वर्ग जोडण्यास स्वयंअर्थसहायित तत्वावरच मान्यता देण्यात येईल. संस्थेची/शाळेची मागणी विना अनुदानित तत्वावर वर्ग देण्याची असली तरी ती मान्य करता येणार नाही.

२. यापूर्वी ज्या इ. ४ थी पर्यंतच्या शाळांना इ. ५ वी चा वर्ग व इ. ७ वी पर्यंतच्या शाळांना इ. ८ वी चा वर्ग जोडण्यास स्वयंअर्थसहायित तत्वावर परवानगी दिली आहे, ती परवानगी स्वयंअर्थसहायित तत्वावरच कायम राहील.

**३. शाळेत इयत्ता ५ वी च्या वर्गासाठी किमान पटसंख्या ३० व इ. ८ वी च्या वर्गासाठी किमान पटसंख्या ३५ आवश्यक राहील.**

**४. ज्या शाळेत इ. ५ वी चा वर्ग जोडायचा आहे त्या शाळेच्या १ कि.मी. परिसरात त्याच माध्यमाचा इ. ५ वी चा वर्ग असता कामा नये त्याचबरोबर इ. ८ वी चा वर्ग जोडायचा असल्यास त्या शाळेच्या ३ कि.मी. परिसरात त्याच माध्यमाचा इ. ८ वी चा वर्ग असता कामा नये. याबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प./आयुक्त मनपा/मुख्याधिकारी नपा/कमांडींग ऑफिसर कटक मंडळ यांनी स्पष्ट शिफारस करणे आवश्यक आहे.**

५. सदर शाळेमध्ये इ. ५ वी/इ. ८ वी चा वर्ग सुरू करण्याबाबत शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांची मागणी असावी व त्या वर्गात (इ. ५ वी/इ. ८ वी मध्ये) किमान पटसंख्येइतके (३०/३५) प्रवेश होणे आवश्यक राहील.

६. सदर इ. ५ वी/इ. ८ वी च्या वर्गासाठी वर्गखोली उपलब्ध असावी. तसेच विद्यार्थ्यांसाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार पुढील आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात. (१) इमारत (२) मुख्याध्यापक खोली (३) प्रत्येक शिक्षकाला एक खोली (४) रॅम्प (५) मुलांसाठी स्वच्छतागृह (६) मुलींसाठी स्वच्छतागृह (७) पिण्याच्या पाण्याची सुविधा (८) स्वयंपाक गृह (९) संरक्षक भिंत (१०) खेळाचे मैदान.

**७. इ. ८ वी चा वर्ग सुरू करण्यासाठी विज्ञान प्रयोगशाळा उपलब्ध असणे आवश्यक राहील.**

उपरोक्त अटी/शर्तीनुसार वरील शाळेच्या प्रस्तावाची तपासणी केली असता सदरची शाळा इ. ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यासाठी पात्र असल्याने संचालनालयाची वर्ग जोडण्यास शिफारस आहे. मान्यतेस्तव सादर.

04.08.2020

**(द.गो. जगताप)**
शिक्षण संचालक,(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत **माहितीस्तव :**
मा. आयुक्त शिक्षण, म.रा. पुणे.